**ठळक बातम्या**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन २० जुलै ते १३ ऑगस्ट दरम्यान
- पश्चिम आशियातल्या संकटाच्या काळात केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळं इंधन दरवाढ आटोक्यात राहिल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- केंद्र सरकारकडून कांद्याच्या दरात २ हजार १२५ रुपये क्विंटलपर्यंत वाढ

**आणि**

- इंग्लंड विरुद्धच्या दुसऱ्या टी - २० सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा भारताचा निर्णय, वैभव सुर्यवंशीचा संघात समावेश

**<><><><><><>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २० जुलै ते १३ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरून ही माहिती दिली.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या संदर्भात नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल या अधिवेशनात सादर होणार असल्याचं लोकसभा सभापती ओम बिर्ला म्हणाले.

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या दिवसात जगात सर्वत्र इंधनपुरवठ्याचा पेच उद्भवला परंतु समयोचित निर्णय, प्रभावी मुत्सद्देगिरी आणि देशाच्या साधनसंपत्तीचं उचित व्यवस्थापन याच्या जोरावर या संकटातून देशानं वाट काढली असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राजस्थानात बलोत्रा इथं तेलशुद्धिकरण आणि पेट्रोरासायनिक संकुलाचं उद्धाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारताचे जगात सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध असल्यानं, पूर्वी २५ -२६ देशांकडून इंधन आयात केलं जात असे, ते आता ४० देशांकडून येऊ लागलं असं ते म्हणाले.

देशात इंधनाचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने उपाययोजना केल्या त्यामुळे एलपीजी सिलिंडरचे दर ९०० रुपये पर्यंत राहिले, अन्यथा ते दोन हजार प्रतिसिलिंडरपर्यंत कडाडले असते असं मोदी म्हणाले. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळं खतांच्या किंमती आटोक्यात राहिल्याचंही ते म्हणाले.

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुजरातमध्ये साणंद इथं 'सीजी सेमी'च्या या अत्याधुनिक सेमीकंडक्टर प्रकल्पाचं उद्घाटन केलं. हा प्रकल्प भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्रांतीमधली पुढची पायरी आहे, असं ते यावेळी म्हणाले. साणंद इथला प्रकल्प दरवर्षी २० कोटी चिप्सचं उत्पादन करायला सज्ज आहे. तसंच, उत्पादनाची क्षमता वाढवून ती वर्षाला ५०० कोटी चिप्सपर्यंत नेण्याचं महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवल्याबद्दल त्यांनी 'सीजी सेमी'चं अभिनंदन केलं.

या वर्षाच्या अखेरीस देशात पाच सेमिकंडक्टर प्रकल्प कार्यान्वित झालेले असतील, अशी ग्वाही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

सुधारित 'उडान' योजनेचा शुभारंभ हा भारताच्या प्रादेशिक संपर्क-सुविधेच्या प्रवासातील एक नवीन अध्याय ठरेल, असं मत नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी व्यक्त केलं. या योजनेमुळे १०० हून अधिक नवीन विमानतळ आणि २०० हेलिपॅड्सच्या विकासाला चालना मिळेल. जोधपूर विमानतळावरील नवीन टर्मिनलच्या उद्घाटनाच्या वेळी त्यांनी हे मत व्यक्त केलं. यासाठी २८ हजार ८४० कोटी रुपयांहून अधिक तरतुदी केली आहे.

**<><><><><>**

सखोल चाचण्यांनंतर वाहनांसाठी २० टक्के इथेनॉल मिश्रित इंधन वापरात आणले आहे. त्यामुळं वाहनधारकांनी याविषयी कोणतीही शंका मनात बाळगू नये

असं आवाहन पेट्रोलियम तज्ञ आणि वाहन उद्योगानं केलं आहे. यासंदर्भात देशभरात विविध ठिकाणी वार्ताहर परिषद घेऊन नागरिकांचे संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न आज त्यांनी केला. या इंधनाचा वापर केल्यानं वाहनांच्या मायलेजमध्ये फारसा फरक पडत नाही. तसंच देखभालीचा खर्चही वाढत नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. ई-20 इंधनासाठी तयार करण्यात आलेली वाहने सुमारे ४० ते ६० हजार किलोमीटरपर्यंत प्रयोगशाळेत आणि प्रत्यक्ष रस्त्यावर चाचणी केल्यानंतर वापरात आणली जातात असं ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाचे संचालक डॉ. रेजी माथाई म्हणाले.

**<><><><><>**

केंद्र  सरकारने कांद्याचा खरेदी दर १३ टक्क्यांनी वाढवला आहे. हा दर १ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटलवरून २ हजार १२५ रुपये प्रति क्विंटल केला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने ही माहिती दिली. सुधारित खरेदी दर आजपासून लागू झाला आहे. सरकारच्या किंमत स्थिरीकरण धोरणाअंतर्गत 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत कांद्याची खरेदी सध्या सुरू आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, कांद्याचं उत्पादन ३०७ लाख मेट्रिक टनांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये सध्या  पुरेसा साठा असून, कांद्याच्या तुटवड्याची कोणतीही चिन्हं सध्या दिसत नाहीत, असंही मंत्रालयाने सांगितलं.

**<><><><><>**

टीईटी पेपरफुटीच्या प्रकरणात पोलिसांनी आणखी ३ जणांना अटक केली आहे. हे तिघे परीक्षेचा पेपर छापण्यात आलेल्या आग्र्यातल्या छापखान्याचे कर्मचारी

आहेत. या आरोपींना भिवंडीतल्या न्यायालयानं ९ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण १० जणांना अटक झाली आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी भारतात यकृत विकार आणि झपाट्यानं वाढणाऱ्या टाईप २ मधुमेहाच्या समस्येवर मात करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृतीवर आधारित राष्ट्रीय मोहीम राबवण्याची गरज अधोरेखित केली. ते आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमात बोलत होते. हे आजार आता पूर्वीपेक्षा कमी वयात दिसून येत असल्यानं ही केवळ वैद्यकीय राहिली नसून सामाजिक आणि सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या बनली आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

अंमली पदार्थांच्या मागणीत घट करण्याच्या उद्देशानं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयानं राष्ट्रीय योजना सुरू केली आहे. अंमली पदार्थांबाबत जागरूकता निर्माण करणं, क्षमता विकास, उपचार, पुनर्वसन आणि सामाजिक एकत्रीकरण यांच्या माध्यमातून अंमली पदार्थांच्या सेवनाला प्रतिबंध घालणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असं केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री वीरेंद्र कुमार यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

अयोध्येतल्या श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासानं प्रशासकीय आणि आर्थिक बाबींसंबंधी चर्चा करण्यासाठी येत्या सोमवारी सदस्यांची बैठक बोलावली आहे. न्यासाला प्राप्त होत असलेल्या देणग्यांच्या मोजणीचा तपास करत असलेल्या विशेष तपास पथकानं नोंदवलेल्या निरीक्षणांबाबतही या बैठकीत चर्चा होईल. याशिवाय, सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ अनिल मिश्रा यांनी सादर

केलेल्या राजीनाम्यांसह राम मंदिराच्या आगामी व्यवस्थापनाशी संबंधित बाबींचाही बैठकीच्या विषयपत्रिकेत समावेश आहे.

<><><><><>

भारत आणि इस्राएल यांच्यातला द्विपक्षीय गुंतवणूक करार आजपासून लागू झाला आहे. नवी दिल्लीत गेल्यावर्षी या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या होत्या. हा करार दोन्ही देशांमधले आर्थिक संबंध आणखी दृढ करण्याच्या तसंच गुंतवणुकीसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

इराणचे सर्वोच्च नेते असलेले अयातुल्ला अली खामेनेई यांच्या अंत्यविधीला आज इराणमध्ये सुरुवात झाली. इराणी जनता हजारोंच्या संख्येने या अंत्यविधीत सहभागी झाली. भारताचे प्रतिनिधी म्हणून परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पबित्र मार्गेरिटा तसंच बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

युक्रेनच्या ड्रोननी सेंट पिटर्सबर्ग इथं रशियन तेलसाठ्यांवर आज हल्ला केला मात्र रशियाच्या हवाई संरक्षण प्रणालीने शहर आणि आसपासच्या भागांत सुमारे डझनभर ड्रोन रोखल्याचा दावा रशियन अधिकाऱ्यांनी केला आहे. देशाच्या दुसऱ्या सर्वात मोठ्या शहरावर झालेले सुमारे ७२ हल्ले रशियाच्या हवाई संरक्षण प्रणालीने परतवून लावल्याचं सेंट पिटर्सबर्गचे गव्हर्नर अलेक्झांडर बेगलोव्ह यांनी म्हटलं आहे. तर, रशिया विरुद्धच्या युक्रेनच्या लांब पल्ल्याच्या कारवाईचा हा भाग असल्याचं युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड मध्ये होत असलेल्या दुसऱ्या टी - २० सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १४ षटकांत ३ बाद १३८ धावा झाल्या होत्या. यासंघात वैभव सुर्यवंशीला स्थान मिळालं आहे. १५ वर्ष आणि ९९ दिवसाचा असताना त्याचा भारतीय संघात समावेश झाला. त्यानं सचिन तेंडुलकरचा कमी वयात भारतीय संघात स्थान मिळवण्याचा विक्रम मोडला आहे.

**//<><><><><><>//**